# मानवता धर्म

**चाल: दिलं हि दिलं मे ले लिया, मेहरबानी**

माणसा या माणसाशी, प्रेम भावे वाग तू
मानवता धर्म आहे, धर्माला या जाग तू ....||ध०||

प्रेम तुझा धर्म आहे, प्रेम दे अन प्रेम घे
द्वेष मत्सर वैर निंदा, अहंभाव त्याग तू ....||१||

तु मनात विषमतेचे, विष नको रे कालवु
जाती धर्माच्या रे नावे, लावू नको आग तू ....||२||

सकळीकांना सुख मिळावे, ठेवी शुद्ध भावणा
मानवाच्या हितासाठी, भक्ती मार्गी लाग तू ....||३||

सहनशक्ती विशालता अन,माया ममता करुणा
गुरु समिप "परशुरामा", सद्गुण हे माग तू ....||४||



**कवी: परशुराम कारंडे 'समिप'**